आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in गुरुवार दिनांक 17/09/2026 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन | पिंपरी चिंचवड व पुणे | पान 4 | अंक 197 | RNI - MAHMAR /2021/51259 | metrocity924@gmail.com

# पिंपरी-चिंचवड महोत्सव २०२६ शहराच्या सांस्कृतिक वैभवाचा भव्य उत्सव ठरणार

## कला, साहित्य, संगीत आणि संस्कृतीचा त्रिदिवसीय सोहळा; १८ ते २० सप्टेंबरदरम्यान विविध कार्यक्रमांची मेजवानी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : कला, साहित्य, संगीत, संस्कृती आणि पिंपरी-चिंचवड शहराच्या समृद्ध परंपरेचा उत्सव साजरा करणाऱ्या 'पिंपरी-चिंचवड महोत्सव 2026' संदर्भात आज महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधून महोत्सवाची रूपरेषा, विविध सांस्कृतिक कार्यक्रम, कलाकारांचा सहभाग तसेच पुरस्कार सोहळ्याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.**



शहरातील कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, साहित्यिक व सांस्कृतिक चळवळीला नवी ऊर्जा मिळावी तसेच कला, साहित्य, क्रीडा, सामाजिक, शैक्षणिक यांसह विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या गुणवंतांचा गौरव व्हावा, हा या महोत्सवाच्या आयोजनामागील प्रमुख उद्देश आहे.

दि. 18 ते 20 सप्टेंबर 2026 या कालावधीत आयोजित या त्रिदिवसीय सांस्कृतिक पर्वात विविध कलाविष्कार, नामवंत कलाकारांचे कार्यक्रम, साहित्यिक उपक्रम, संगीत, लोककला तसेच विविध क्षेत्रांतील गुणवंतांचा सन्मान अशा विविध कार्यक्रमांची मेजवानी नागरिकांना अनुभवता येणार आहे. पिंपरी-चिंचवड शहराची सांस्कृतिक अस्मिता, कलावैभव आणि सर्जनशीलता अधोरेखित करणारा हा महोत्सव ठरणार आहे.

शहरातील कलाकार, साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यकर्ते आणि गुणवंतांना व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याबरोबरच नागरिकांना दर्जेदार कलाविष्कारांचा अनुभव घेता यावा, या दृष्टीने महोत्सवाचे नियोजन करण्यात आले आहे. शहरातील नागरिकांनी कुटुंबासह मोठ्या संख्येने सहभागी होऊन या सांस्कृतिक पर्वाचा आनंद घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. पत्रकार परिषदेस आमदार अमित गोरखे, आमदार उमा खापरे, उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, कला, क्रीडा, सांस्कृतिक व पर्यटन समितीचे सभापती कैलास कुटे आणि नगरसदस्य राहुल कलाटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

### "शहराच्या सांस्कृतिक ओळखीला नवी उंची मिळेल" – स्वागताध्यक्ष तथा महापौर रवि लांडगे

"पिंपरी-चिंचवड शहर हे केवळ औद्योगिक नगरी म्हणून नव्हे, तर कला, साहित्य, संगीत आणि संस्कृतीची समृद्ध परंपरा जपणारे शहर म्हणूनही आपली स्वतंत्र ओळख निर्माण करत आहे.

स्थानिक कलाकार, साहित्यिक आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंतांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे आणि नागरिकांना दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रमांचा अनुभव घेता यावा, या उद्देशाने 'पिंपरी-चिंचवड महोत्सव 2026'चे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागातून हा महोत्सव शहराच्या सांस्कृतिक वाटचालीतील संस्मरणीय पर्व ठरेल," असे स्वागताध्यक्ष तथा महापौर रवि लांडगे यांनी सांगितले.

### "स्थानिक प्रतिभेला व्यापक व्यासपीठ देणारा महोत्सव" – मुख्य संयोजक तथा आमदार अमित गोरखे

"पिंपरी-चिंचवडमध्ये कला, साहित्य, संगीत, नाट्य आणि लोककलेच्या क्षेत्रात मोठी प्रतिभा आहे. या प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि नवोदित कलाकारांना आपली कला सादर करण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी अशा महोत्सवांची आवश्यकता आहे. 'पिंपरी-चिंचवड महोत्सव 2026'च्या माध्यमातून स्थानिक कलाकारांसोबत विविध क्षेत्रांतील गुणवंतांचा गौरव होणार असून शहराच्या सांस्कृतिक चळवळीला अधिक बळ मिळेल," असे मुख्य संयोजक तथा आमदार अमित गोरखे यांनी सांगितले.

### "सर्वांच्या सहभागातून शहराचा सांस्कृतिक उत्सव साकारतोय" – मुख्य संयोजक तथा विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर

"कला आणि संस्कृती ही शहराच्या सामाजिक जीवनाला समृद्ध करणारी महत्त्वाची शक्ती आहे. पिंपरी-चिंचवडमधील विविध सांस्कृतिक प्रवाह, परंपरा आणि कलागुणांना एकाच व्यासपीठावर आणण्याचा प्रयत्न या महोत्सवातून होत आहे. सर्व घटकांच्या सहभागातून साकारत असलेला हा महोत्सव शहरातील सांस्कृतिक वातावरण अधिक समृद्ध करेल.

नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभागी होऊन या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा," असे मुख्य संयोजक तथा विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले.



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 17/09/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# नगरसेविका स्वाती माई काटे यांच्या पुढाकारातून प्रभाग 30 मध्ये सफाई मोहीम

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

दापोडी : दापोडीतील प्रभाग क्रमांक 30 मधील रेल्वे लाईनजवळील सिद्धार्थनगर परिसरातील मोठ्या नाल्यात मोठ्या प्रमाणात साचलेली घाण, कचरा आणि गाळ यामुळे परिसरात दुर्गंधी तसेच अस्वच्छतेचे वातावरण निर्माण झाले होते.

या पार्श्वभूमीवर स्थानिक नगरसेविका स्वाती माई काटे यांच्या प्रभाग पुढाकारातून नाल्याची स्वच्छता करण्यात आली.





सिद्धार्थनगर परिसरातील या नाल्यात अनेक दिवसांपासून कचरा व घाण साचल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. पावसाळ्यात नाल्यातील पाण्याचा प्रवाह सुरळीत राहण्यासाठी तसेच परिसरात पाणी साचण्याची शक्यता कमी करण्यासाठी नाल्यातील कचरा, घाण आणि गाळ काढण्याचे काम हाती घेण्यात आले. नगरसेविका स्वाती माई काटे यांच्या पुढाकारातून संबंधित कर्मचाऱ्यांनी नाल्यात उतरुन साचलेला कचरा बाहेर काढला. त्यानंतर परिसराची साफसफाई करुन औषध फवारणी करण्यात आली. त्यामुळे नाल्याची स्वच्छता होण्याबरोबरच डासांचा प्रादुर्भाव आणि दुर्गंधी कमी होण्यास मदत होणार आहे.

सिद्धार्थनगरमधील नागरिकांच्या दैनंदिन आरोग्याशी संबंधित समस्या लक्षात घेऊन ही स्वच्छता मोहीम राबविण्यात आल्याने नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात आले. परिसरातील नाले, गटारे आणि सार्वजनिक ठिकाणांची नियमित स्वच्छता करण्याची मागणीही नागरिकांकडून करण्यात येत आहे.

"नागरिकांना स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरण मिळणे ही प्राथमिक जबाबदारी आहे.

प्रभागातील स्वच्छतेशी संबंधित समस्या निदर्शनास येताच त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला जात आहे," अशी भूमिका नगरसेविका सौ. स्वाती माई काटे यांनी व्यक्त केली.

# ज्येष्ठ कीर्तनकार डॉ. चारुदत्त आफळे यांचा पुणे फेस्टिव्हलतर्फे सन्मान

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : ज्येष्ठ कीर्तनकार ह. भ. प. डॉ. चारुदत्त आफळे यांच्या कीर्तन कलेतील योगदानाबद्दल पुणे फेस्टिव्हलतर्फे बुधवारी पुण्यातील पत्रकार भवन येथील सभागृहात 'किर्तन रत्न' पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. सन्मानचिन्ह, पुणेरी पगडी, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ असे सन्मानाचे स्वरुप होते. यावेळी कीर्तन कलानिधी रामचंद्र भिडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच पुणे फेस्टिव्हलचे विश्वस्त मोहन टिल्लू आणि ह. भ. प. निवेदिता मेहेंदळे मंचावर उपस्थित होते.**




सत्काराला उत्तर देताना डॉ. चारुदत्त आफळे म्हणाले, "सांस्कृतिक कार्यक्रमांचा मोठा आधारस्तंभ म्हणून कृष्णकुमार गोयल यांच्याकडे पाहिले जाते. त्यांच्या पुढाकारामुळे नागरिकांसमोर विविध दर्जेदार कार्यक्रम सादर होत आहेत. मला अनेक पुरस्कार मिळाले आहेत; मात्र 27 वर्षांनंतर पुण्याचा हक्काचा पुरस्कार मिळत असल्याचा विशेष आनंद आहे."

कीर्तन परंपरेशी युवा पिढीला जोडण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. "शाळा आणि महाविद्यालयांमध्ये कीर्तनाचे प्रशिक्षण देण्याची योजना कीर्तनकारांची आहे. पुणे फेस्टिव्हलने यासाठी पुढाकार घेतल्यास समाजोपयोगी विषयांवर कीर्तनाच्या माध्यमातून जनजागृती करता येईल. युवा पिढीच्या ऊर्जेला योग्य दिशा दिल्यास त्यातून उत्तम कार्य उभे राहू शकते. जेन झी पिढीबाबत केवळ भाष्य करण्यापेक्षा तिला समजून घेऊन पुढे जाण्याची गरज आहे," असे त्यांनी सांगितले.

रामचंद्र भिडे म्हणाले, "पुणे फेस्टिव्हलची 38 वर्षांची वाटचाल कौतुकास्पद आहे. डॉ. आफळे यांचे कीर्तनावरील प्रेम, जिद्द आणि देशप्रेम पाहता त्यांची सन्मानासाठी झालेली निवड योग्य आहे. कीर्तन प्रशिक्षणाला प्रोत्साहन दिल्यास भविष्यात पुणे फेस्टिव्हलमध्ये तीन दिवसांचा कीर्तन महोत्सवही आयोजित करता येईल."

कृष्णकुमार गोयल म्हणाले, "कीर्तन ही समाजाला शिक्षण आणि संस्कार देणारी प्रभावी कला आहे. पुण्याला अध्यात्म आणि सांस्कृतिक क्षेत्राची समृद्ध परंपरा लाभली आहे. ही परंपरा जपण्याचे काम पुणे फेस्टिव्हलच्या माध्यमातून सुरु आहे. दिवंगत नेते सुरेश कलमाडी यांनी सुरु केलेला पुणे फेस्टिव्हल आजही अखंडपणे सुरु आहे. डॉ. आफळे यांनी कीर्तनातून इतिहास, संस्कार आणि समाजाला जोडण्याचे काम केले आहे. कीर्तनाशी युवा पिढी जोडली जाणे आवश्यक आहे."


कार्यक्रमाची सुरुवात तन्मयी मेहेंदळे-कुलकर्णी यांच्या नांदीने झाली. त्यानंतर ह.भ.प. निवेदिता मेहेंदळे यांनी श्री गणेश उपासना कीर्तनातून अष्टविनायकांपैकी पाली येथील बल्लाळ गणपतीची कथा सादर केली. त्यांना तबल्याला ओंकार जोशी आणि संवादिनीवर साहिल पुंडलिक यांनी वाद्यसाथ केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन आडेकर यांनी केले. तन्मयी मेहेंदळे-कुलकर्णी यांनी आभार मानले.

# विकासकामांना गती देण्यासाठी पिंपरी-चिंचवडमध्ये आता ‘एमडी पॅटर्न’

## आमदार महेश लांडगे यांचे जिल्हाधिकारी, आयुक्तांना निर्देश

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**जिल्हाधिकारी कार्यालय, महापालिका प्रशासनाकडे प्रलंबित असलेल्या विकासकामांना गती देण्यासाठी आता ‘एमडी पॅटर्न’ राबवण्यात येणार आहे. आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत भूसंपादन, जागा आरक्षण, जागा हस्तांतरण आणि प्रशासकीय मान्यतेअभावी रखडलेल्या सात प्रमुख विषयांचा प्रकरणनिहाय आढावा घेण्यात आला. प्रत्येक कामासाठी जबाबदार अधिकारी, नोडल यंत्रणा आणि निश्चित कालमर्यादा ठरवून पुढील बैठकीत ‘ॲक्शन टेकन रिपोर्ट’ सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.**



पुणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे झालेल्या बैठकीला जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी तसेच महसूल, भूसंपादन, भूमी अभिलेख, वन विभाग आणि महापालिकेचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

यावेळी “भोसरी विधानसभा मतदारसंघातील ही सर्व कामे नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी आणि मतदारसंघाच्या भविष्यातील विकासाशी संबंधित आहेत. त्यामुळे केवळ बैठकीपुरती चर्चा नको. प्रत्येक विषयावर ठोस निर्णय घेऊन जबाबदार अधिकारी आणि निश्चित कालमर्यादा ठरवावी. त्यानुसार प्रत्यक्ष कार्यवाही झाली पाहिजे,” अशी स्पष्ट भूमिका आमदार महेश लांडगे यांनी मांडली.

पिंपरी-चिंचवड शहरासह भोसरी विधानसभा मतदारसंघातील अनेक महत्त्वाचे रस्ते, रस्त्यांचे रुंदीकरण आणि एकूण 22 ‘मिसिंग लिंक’ची कामे भूसंपादनाअभावी रखडली आहेत. चाकण औद्योगिक क्षेत्राशी कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी ही कामे प्राधान्याने पूर्ण करण्याची गरज बैठकीत अधोरेखित करण्यात आली. प्रत्येक रस्त्यासाठी आवश्यक क्षेत्रफळ, सर्व्हे क्रमांक, बाधित जमीनमालक, मोबदला आणि भूसंपादनाचा सद्य टप्पा यांची प्रकरणनिहाय माहिती सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. अधिसूचना, निवाडा, मोबदला किंवा प्रत्यक्ष ताबा यापैकी नेमका कोणता टप्पा प्रलंबित आहे, हे स्पष्ट करून सर्व संबंधित ठिकाणांची पाहणी 25 ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्याची कालमर्यादा निश्चित करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या महत्त्वाकांक्षी इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पांतर्गत तळवडे ते चऱ्होली नदीकिनारी प्रस्तावित रस्त्याच्या भूसंपादनाचाही आढावा घेण्यात आला. वाहतूक आणि कनेक्टिव्हिटीच्या दृष्टीने हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा आहे. महसूल, भूसंपादन, भूमी अभिलेख आणि महानगरपालिका प्रशासनाने समन्वयातून कार्यवाही करावी, स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करावा आणि आवश्यक जमीन उपलब्ध करून देण्यासाठी निश्चित वेळापत्रक तयार करावे, असे निर्देश देण्यात आले.

# पिंपरी-चिंचवडमध्ये 16 ते 29 सप्टेंबरदरम्यान मनाई आदेश

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 च्या कलम 37(1)(3) अन्वये 16 सप्टेंबर रोजी 00.01 वाजेपासून 29 सप्टेंबर रोजी 24.00 वाजेपर्यंत मनाई आदेश लागू करण्यात आला आहे. पोलीस सह आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर यांनी हा आदेश जारी केला आहे.**



या कालावधीत विविध सण, उत्सव, जयंती-पुण्यतिथी तसेच 25 सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशी असल्याने मोठ्या प्रमाणावर नागरिकांची गर्दी होण्याची शक्यता आहे. तसेच विविध मागण्यांसाठी राजकीय पक्ष, सामाजिक संघटना यांच्या वतीने मोर्चे, धरणे, निदर्शने, उपोषणे, बंद आदी आंदोलने होण्याची शक्यता लक्षात घेऊन हा आदेश देण्यात आला आहे.

मनाई आदेशाच्या कालावधीत दाहक अथवा स्फोटक पदार्थ, ज्वलनशील द्रव पदार्थ, दगड, शस्त्रे-अस्त्रे, फेकण्याची हत्यारे, काचेचे तुकडे किंवा रिकाम्या काचेच्या बाटल्या बाळगणे, जमा करणे अथवा तयार करणे यास मनाई करण्यात आली आहे. तसेच चाकू, सुरा, कोयता, तलवार, भाले, काठ्या, बंदुका किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल अशा वस्तू सोबत बाळगण्यासही प्रतिबंध आहे.

पोलीस आयुक्तांची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींचा जमाव करणे, सभा घेणे अथवा मिरवणूक काढणे यासही बंदी घालण्यात आली आहे. तसेच आक्षेपार्ह घोषणा, सभ्यता व नीतिमत्तेला धोका निर्माण करणारी भाषणे किंवा कायदा-सुव्यवस्थेला बाधा आणणारे कृत्य करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

शासकीय सेवेतील व्यक्ती तसेच वरिष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्यपूर्तीसाठी हत्यार बाळगणे आवश्यक असलेल्या व्यक्तींना हा आदेश लागू राहणार नाही.

आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 मधील कलम 135 नुसार कारवाई करण्यात येणार आहे, असे आदेशात नमूद आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 17/09/2026

e Paper

पिंपरी चिंचवड | पुणे

# पाणीपुरवठा, जलनि:सारण, दिव्यांग भवन, बस डेपो, महिला वसतिगृह, स्वच्छता व इतर नागरी सुविधांशी संबंधित निर्णय

## स्थायी समितीच्या सभेत विविध महत्त्वाच्या विषयांना स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांची मंजुरी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : मा. स्थायी समितीची साप्ताहिक सभेत शहराच्या विकासाशी निगडित तसेच नागरिकांच्या सोयी-सुविधांशी संबंधित विविध महत्त्वाच्या प्रस्तावांवर चर्चा करून स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी मंजुरी दिली. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जंगम, विक्रांत बगाडे, तृप्ती सांडभोर यांच्यासह समिती सदस्य तसेच पालिकेतील विविध विभागांचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.**



स्थायी समिती बैठकीत पाणीपुरवठा, जलनिःसारण, दिव्यांग भवन, बस डेपो व चार्जिंग स्टेशन, महिला वसतिगृह, स्वच्छता, रस्ते, शाळा, पशुवैद्यकीय सेवा तसेच विविध नागरी सुविधांशी संबंधित महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

पाणीपुरवठा विभागांतर्गत नवी सांगवी परिसरात टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याच्या कामास मंजुरी देण्यात आली.

तसेच जलनिःसारण विभागांतर्गत जलनिःसारण नलिकांची आधुनिक पद्धतीने देखभाल व दुरुस्ती करण्याच्या कामास मंजुरी देण्यात आली.

मोरवाडी येथील सुमारे 24 हजार चौ. फूट क्षेत्रफळाच्या दिव्यांग भवनात विविध प्रकारच्या दिव्यांग नागरिकांसाठी थेरपी, समुपदेशन, फिजिओथेरपी, हायड्रोथेरपी, स्पीच थेरपी, ऑक्युपेशनल थेरपी, कौशल्य व व्यावसायिक मार्गदर्शन केंद्र, ऑडिटोरियम आणि लायब्ररी यांसह विविध सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

या दिव्यांग भवनाचे प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी संचालक मंडळाच्या रचनेबाबतच्या प्रस्तावासही मंजुरी देण्यात आली.

मौजे वाकड येथील पीएमपीएमएल बस डेपो आणि कार्यालयाची इमारत विकसित करणे तसेच बसेससाठी चार्जिंग स्टेशन प्रणाली उभारण्याच्या कामासाठी आवश्यक असलेल्या उच्चदाब भूमिगत विद्युत वाहिनी आणि वीजपुरवठ्याशी संबंधित कामांना मंजुरी देण्यात आली.

प्रभाग क्र. 25, वाकड येथे कार्यरत महिलांसाठी वसतिगृह बांधण्याच्या कामांतर्गत चालू आर्थिक वर्षातील जमा व खर्च लेखाशीर्षामध्ये आवश्यक सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.

स्वच्छ महाराष्ट्र भारत अभियानांतर्गत क क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत महिला बचत गटाच्या माध्यमातून शून्य कचरा (Zero Waste) प्रकल्प राबविण्यास मुदतवाढ व मंजुरी देण्यात आली.

प्रभाग क्र. 11 मधील मनपाच्या विविध कार्यक्रमांसाठी मंडप व्यवस्था करणे, तसेच प्रभाग क्र. 22, काळेवाडी आणि प्रभाग क्र. 18, चिंचवड येथील रस्त्यांच्या दुरुस्तीच्या कामांसाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करून पुढील करारांना मंजुरी देण्यात आली.

शिक्षण मंडळ विभागामार्फत प्राथमिक शाळांमध्ये बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही यंत्रणेची वार्षिक तत्त्वावर देखभाल व दुरुस्ती करण्याच्या कामास मान्यता देण्यात आली.

महापालिका हद्दीतील दिव्यांग व्यक्तींना मोफत बस पास देणे, तसेच 60 वर्षांवरील अंध व्यक्तींच्या सोबतीदारांना बस प्रवासाचा पास देण्याच्या योजनेअंतर्गत झालेल्या प्रत्यक्ष खर्चास मंजुरी देण्यात आली.

प्रभाग क्र. 03, चऱ्होली येथे नव्याने तयार करण्यात आलेल्या रस्त्यांवर स्ट्रीट लाईट सुरु करण्यासाठी नवीन वीजमीटर घेण्यास आणि वीजपुरवठा कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात आली.

महापालिकेच्या विविध पशुवैद्यकीय रुग्णालयांमध्ये, ॲम्ब्युलन्सवर, डॉग व्हॅन आणि डॉग पार्क इत्यादी ठिकाणी आवश्यक मनुष्यबळ पुरवण्यासाठी एजन्सीची निवड करून कामाचे आदेश देण्यास मंजुरी देण्यात आली.

महापालिकेच्या विविध विभागांचे दैनंदिन कामकाज तसेच आगामी सार्वत्रिक निवडणूक कामकाजासाठी मतदार याद्या व इतर कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती काढण्याच्या कामाचा दरकरार निश्चित करून त्यास मान्यता देण्यात आली.

महापालिकेतील सेवानिवृत्त व मयत कर्मचाऱ्यांची वेतन पडताळणी व पेन्शनविषयक प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी अनुभवी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची मानधनावर पुनर्नियुक्ती करण्यास मंजुरी देण्यात आली.

बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानांतर्गत महापालिका क्षेत्रात मूलभूत नागरी सुविधांचा विकास करण्यासाठी प्राप्त अनुदानातून शाळांमध्ये प्रयोगशाळा व वाचनालय विकसित करणे, जिम उपकरणे बसविणे आणि रुग्णालयांसाठी वैद्यकीय उपकरणे खरेदी करणे यांसारख्या भांडवली कामांचा समावेश करण्यास मंजुरी देण्यात आली.

स्वच्छ सर्वेक्षण 2025 मोहिमेचा भाग म्हणून शहरातील विविध प्रभागांमध्ये नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यासाठी संदेश, घोषवाक्ये आणि बोलकी चित्रे रंगविण्याच्या कामांना मंजुरी देण्यात आली.

> पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना अधिक सक्षम, दर्जेदार आणि वेळेत नागरी सुविधा उपलब्ध करून देणे ही महापालिकेची प्रमुख जबाबदारी आहे.
>
> आजच्या स्थायी समितीच्या बैठकीत पाणीपुरवठा, जलनिःसारण, दिव्यांग कल्याण, सार्वजनिक वाहतूक, महिला सुविधा, स्वच्छता, शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांशी संबंधित विविध महत्त्वपूर्ण प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे.
>
> या निर्णयांची प्रभावी आणि वेळेत अंमलबजावणी होऊन त्याचा थेट लाभ नागरिकांना मिळावा, यासाठी प्रशासनाने आवश्यक कार्यवाही करावी. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन अशाच प्रकारे सकारात्मक आणि लोकाभिमुख निर्णय घेण्यास स्थायी समिती कटिबद्ध आहे.
>
> **अभिषेक बारणे**
> सभापती - स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महापालिका.

# सुपे घाटात चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस खाली कोसळली; अनेक विद्यार्थी जखमी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बारामती तालुक्यातील सुपे घाटात आज सकाळी विद्या प्रतिष्ठानच्या विद्यार्थ्यांना घेऊन जाणाऱ्या एसटी बसचा भीषण अपघात झाला. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने बस रस्ता सोडून संरक्षक कठडा तोडत खाली कोसळली. या अपघातात अनेक शाळकरी विद्यार्थी जखमी झाले असून, घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली.

मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची ही बस चौफुल्याकडून सुप्याच्या दिशेने विद्या प्रतिष्ठानच्या विद्यार्थ्यांना घेऊन जात होती. सुपे घाटातील एका वळणावर अचानक चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले. त्यानंतर बसने रस्त्यालगतचा संरक्षक कठडा तोडला आणि घाटाच्या बाजूला खाली कोसळली.






बस उलटल्यानंतर बसमधील विद्यार्थ्यांमध्ये मोठी घबराट निर्माण झाली. अपघातानंतर विद्यार्थ्यांच्या किंकाळ्यांनी परिसर दणाणून गेला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थ आणि परिसरातील प्रवाशांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी बसमधील जखमी विद्यार्थ्यांना बाहेर काढण्यासाठी तातडीने मदतकार्य सुरु केले.

जखमी विद्यार्थ्यांना तातडीने जवळच्या खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. डॉक्टरांचे पथक जखमी विद्यार्थ्यांवर उपचार करत आहे. सुदैवाने या अपघातात मोठी जीवितहानी झाल्याचे वृत्त अद्याप समोर आलेले नाही.

दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युगेंद्र पवार यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. त्यानंतर त्यांनी रुग्णालयात जाऊन जखमी विद्यार्थ्यांची विचारपूस केली. जखमी विद्यार्थ्यांवर योग्य आणि तातडीने उपचार करण्याच्या सूचना त्यांनी रुग्णालय प्रशासनाला दिल्या. अपघाताच्या पार्श्वभूमीवर बस चालकाचे नियंत्रण नेमके कोणत्या कारणामुळे सुटले, याचा तपास केला जात आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968